सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका
दिनांक :- ०५/१/२०१७.

# उमेदवारांना सूचना

विषयः-पुणे मनपा प्रशासनाकडील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) या पदाकरिता भरती प्रक्रियेबाबत.

पुणे मनपा प्रशासनाकडील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) या पदाकरिता दिनांक ०८/०८/२०१६ व दिनांक ३१/०८/२०१६ अन्वये जाहिर प्रकटन प्रसिद्ध करून पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक ०८/१०/२०१६ रोजी ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली. ऑनलाईन परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण विचारात घेवून संभाव्य भरती कक्षेतील उमेदवारांना दिनांक २०/१२/२०१६ ते दिनांक २२/१२/२०१६ या कालावधीत प्रमाणपत्रे व कागदपत्रे छाननी करणेकामी छाननी समितीसमोर बोलविण्यात आले होते. छाननी समिती समोर ज्या उमेदवारांनी कागदपत्रे /प्रमाणपत्रे पडताळणीसाठी उपस्थित होते अश्या पात्र उमेदवारांमधून समाजिक व समांतर आरक्षणानुसार गुणानुक्रमे निवडयादी / प्रतिक्षायादीतील उमेदवारांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) वेतनश्रेणी र.रू ९३००-३४८०० + ग्रेड.पे.४३०० (पदविकाधारक) /४४००(पदवीधारक) + मान्य भत्ते या पदावर नेमणुक करणेसाठी यासोबतच्या परिशिष्ट 'अ', 'ब ' व 'क ' मध्ये नमूद केलेल्या निवडयादी/ प्रतिक्षायादीवरील उमेदवारांना दिलेला क्रम , मागासवर्गाचे आरक्षण/अनुशेष मे.शासनाकडील वेळोवेळी आदेश , जागांची उपलब्धता इ.बाबी विचारात घेवून नेमणुका करणेस हि कर्मचारी निवड समिती एकमताने मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने निवडयादी/प्रतिक्षायादी सोबतचे परिशिष्ठ अ', 'ब ' व 'क ' प्रसिद्ध करणेत येत आहे तसेच त्याचप्रमाणे निवडयादीतील १४३ उमेदवारांचे नियुक्ती आदेश प्रसिद्ध करणेत येत आहे. निवडयादीतील महिला व खेळाडू या समांतर आरक्षणाच्या उमेदवारांच्या नियुक्ती आदेश अलहिदा पारित करणेत येतील.

तरी संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(प्रकाश बोरसे) 5/1/2017
सदस्य सचिव,तथा
उप आयुक्त (सा.प्र.)
पुणे महानगरपालिका

सोबत :- परिशिष्ठ अ', 'ब ' व 'क ' व नियुक्ती आदेश.